# मुख्य वनसंरक्षक व संचालक संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली यांचे कार्यालय

Tel. No.022 28860362 E-mail - sgnpmumbai@gmail.com

शासन निर्णय क्रमांक सामान्य प्रशासन विभाग संकिर्ण - २७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६ च्या अनुषंगाने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई, बोरीवली पश्चिम गोराई मुंबई - ९१ यांच्या कार्यालयातील सहाय्यक वनसंरक्षक या पदाच्या विवक्षित कामाकरीता १ पद सहाय्यक वनसंरक्षक या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या सेवानिवृत्त अधिका-या मधून करार पध्दतीने नेमणूक करावयाची आहे. सदरची जाहिरात www.mahaforest.gov.in व https://sgnp.maharashtra.gov.in या वनविभागाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आली आहे. तरी खालील अटी व शर्तीची पूर्तता करणा-या इच्छूक सेवानिवृत्त उमेदवाराने अर्ज करावे.

१. अर्हता :-

अ) विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

ब) करार पध्दतीने नियुक्त करावायाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने समक्ष असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

क) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

२. कार्यक्षेत्र :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई, बोरीवली पश्चिम गोराई यांचे कार्यालय

३. कामाचे स्वरुप :-

अ) जमीन / सर्व्हे / वन्यजीव / गुन्हे कक्षाकडी न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

ब) योजना / जमीन / वन्यजीव / गुन्हे कक्षाकडील विविध स्वरुपाचे प्रस्ताव हाताळणे.

क) वन्यजीव / गुन्हे / जमीन कक्षाकडील विविध स्वरुपाचे मासीक, त्रैमासीक हाताळणे

ड) वरील कक्षामधील कर्मचा-यास मार्गदर्शन करावे लागेल.

४. नियुक्तीचा कालावधी :- प्रथम टप्यात देण्यात येणारी नियुक्ती १२ महिन्याकरीता राहील. परंन्तु करार पध्दतीने नियुक्त केलेल्या अधिका-याचे काम समाधान कारकरित्या पुढील कालावधीकरीता अटी व शर्ती न बदलता नियुक्ती कालावधी वाढविण्यात येईल.

५. इतर अटी व शर्ती :-

अ) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

ब) नियुक्तीसाठी समक्ष प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्य करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

क) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपवलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

ड) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

इ) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

ई) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्याच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी समक्ष असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

६. वेतन :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र. संकिर्ण - २७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६ सोबतच्या परीशिष्ट (अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे.

७. अर्जदार हा शारिरीक व मानसिक दृष्टीने सक्षम असणे आवश्यक आहे.व त्याचे वय ६५ वर्षाच्या वर नसावे.

८. निवड करण्यात येणा-या अधिका-यास / व्यक्तीस या कार्यालयाकडून निश्चित केलेल्या विहीत नमुन्यात रु.१००/- चे स्टॅम्पपेपर वर बंधपत्र सादर करावे लागेल.

९. अर्जदाराने स्वहस्ताक्षरात लिहीलेला / टंकलिखीत अर्ज (संपूर्ण माहिती असलेला जसे पुर्ण नाव, जन्म तारीख, पत्ता, शिक्षण, अनुभव काम केलेल्या विभागाचे नाव इ. दिनांक २८/०८/२०१७ ते ०४/०९/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० पर्यन्त कार्यालयीन वेळेत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयाचे पत्यावर किंवा email ID sgnpmumbai@gmail.com वर सादर करावा.

१०. उमेदवाराने दि.०६/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रत्यक्ष मुलाखतीकरीता उपस्थित रहावे.

११. सोबत अर्जाचा नमुना जोडला आहे.

मुख्य वनसंरक्षक व संचालक
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली

अर्जाचा नमुना

फोटो

प्रति,
अध्यक्ष
तथा
मुख्य वनसंरक्षक व संचालक
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान
बोरीवली (पूर्व) मुंबई ४०००६६

विषय :- सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने कामासाठी घेण्याबाबत.
संदर्भ :- वनविभागाच्या वेबसाईटवर / विभागीय कार्यालयाच्या नोटीस बोर्डावरील प्रसिध्द झालेली जाहिरात

महोदय,

मी आपली संदर्भिय जाहिरात व संकेतस्थळावरील तपशिलावर जाहिरात वाचली असुन, माझा वैयक्तिक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नाव :-

२. जन्मतारीख अक्षरी व अंकी :-

३. संपूर्ण पत्ता व मोबाईल / संपर्क क्रमांक / ईमेल आय.डी :-

४. शैक्षणिक पात्रता :-

५. अनुभव :-

अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

ठिकाण:-
दिनांक :-